# MAHARASHTRA ACT No. XXI OF 1965

## THE BOMBAY STATE GUARANTEES (REPEAL) ACT, 1964

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १३ मार्च १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXI OF 1965

## AN ACT TO REPEAL THE BOMBAY STATE GUARANTEES ACT, 1958

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १५ मार्च १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**मुंबई राज्य हमी अधिनियम, १९५८ रद्द करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई राज्य हमी अधिनियम, १९५८ रद्द करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास मुंबई राज्य हमी (रद्द करणे) अधिनियम, १९६४ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. मुंबई राज्य हमी अधिनियम, १९५८ हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३ रद्द करणे.

(यथार्थ अनुवाद)
वा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.

REGISTERED No. B-1

सत्यमेव जयते

The

# Maharashtra Government Gazette

PUBLISHED BY AUTHORITY

THURSDAY, MAY 13, 1965/VAISAKHA 23, 1887.

Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

## PART VIII

## Translations of Bills and Acts in Marathi

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २२.—मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६, हा महाराष्ट्र राज्यात सर्वत्र लागू करणे, त्यासाठी व इतर विवक्षित प्रयोजनाकरिता त्या अधिनियमांत आणखी दुरुस्ती करणे, आणि राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेले तत्सम विधी रद्द करणे याबाबत अधिनियम .. | ५५५–५७१ |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.—आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या ग्रामदान चळवळीस अनुसरून ग्रामदान गावांची स्थापना करणे, व त्याकरिता ग्राम मंडळाची रचना करण्यासाठी आणि तसेच त्याशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे याबाबत अधिनियम .. .. | ५७२–५९१ |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.—भूमि संपादन अधिनियम, १८९४ हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी दुरुस्ती करणे व विवक्षित संपादने आणि संपादनासाठी केलेल्या विवक्षित कार्यवाह्या कायदेशीर ठरविणे, याबाबत अधिनियम .. .. | ५९२–५९५ |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.—राज्याच्या एकत्रित निधीतून दिनांक ३१ मार्च १९६६ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामासाठी कित्येक रकमा देण्याबद्दल व त्याचा विनियोग करण्याबदल प्राधिकृत करण्याबाबत अधिनियम .. | ५९६–६१२ |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.—सर कावसजी जहांगीर बॅरोनसी अधिनियम, १९११ रद्द करणे ; त्या अधिनियमात जाहीर केलेल्या व स्पष्ट केलेल्या विश्वस्तव्यवस्था, अधिकार, उपबंध व प्रतिज्ञालेख रद्द करणे ; उक्त अधिनियमाचे अधिकार चालविण्यासाठी व त्याचे उद्देश पार पाडण्यासाठी स्थापन केलेले विश्वस्थांचे कॉर्पोरेशन विघटित करणे ; उक्त अधिनियमान्वये निर्माण केलेल्या व्यवस्थेखाली येणारी व उपरोक्त कॉर्पोरेशनमध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता सध्याचे बॅरोनेट सर कावसजी जहांगीर यांच्याकडे निहित करणे ; आणि उपरोक्त कारणांशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टींसाठी तरतूद करणे याबाबत अधिनियम .. .. | ६१३–६१५ |
| सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २७.—मुंबईचा शेतातील पिकांवरील कीड व रोग अधिनियम, १९४७ यात आणखी दुरुस्ती करण्याबाबत अधिनियक .. | ६१६–६१७ |

## MAHARASHTRA ACT No. XXII OF 1965

BOMBAY INDUSTRIAL RELATIONS (EXTENSION AND AMENDMENT) ACT, 1964

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १० मार्च १९६५ रोजी मिळाली असून तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

**वी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXII OF 1965

AN ACT TO EXTEND THE BOMBAY INDUSTRIAL RELATIONS ACT, 1946 THROUGHOUT THE STATE OF MAHARASHTRA FOR THAT AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THAT ACT, AND TO REPEAL CORRESPONDING LAWS IN FORCE IN ANY PART OF THE STATE.

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रांत दिनांक २२ मार्च १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६, हा महाराष्ट्र राज्यात सर्वत्र लागू करणे, त्यासाठी व इतर विवक्षित प्रयोजनाकरिता त्या अधिनियमात आणखी दुरुस्ती करणे, आणि राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेले तत्सम विधी रद्द करणे याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ हा महाराष्ट्र राज्यात सर्वत्र लागू करणे, त्यासाठी व इतर विवक्षित प्रयोजनाकरितां त्या अधिनियमात आणखी दुरूस्ती करणे, आणि राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेले तत्सम विधी रद्द करणे इष्ट आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरूस्ती) अधिनियम, १९६४ असे म्हणावे. लघु संज्ञा व प्रारंभ.

(२) तो राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेला मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६, हा याद्वारे उर्वरित महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात येत आहे. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ हा उर्वरित महाराष्ट्र राज्यास लागू करणे.

३. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ (ज्याचा यात यापुढे "मुख्य अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,— सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २ ची दुरुस्ती.

(अ) पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास" या मजकुराऐवजी "सबंध महाराष्ट्र राज्यास" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) यात पुढील परंतुक जादा समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभापासून, हा अधिनियम, राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या ज्या क्षेत्रात, अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद समेट अधिनियम, १९४७, हा अंमलात होता, त्या क्षेत्रात अंमलात येईल.";

(क) पोट-कलम (४) यात पुढील परंतुक जादा समाविष्ट करण्यांत येईल :—

"परंतु, मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरूस्ती) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभापासून या अधिनियमाचे सर्व उपबंध, मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद समेट अधिनियम, १९४७ हा राज्याच्या विदर्भ प्रदेशातील ज्या उद्योगधंद्यास लागू होता, त्या उद्योगधंद्यास लागू होतील.";

(ड) पोट-कलम (४) नंतर पुढील नवीन पोट-कलमे समाविष्ट करण्यांत येतील :—

"(५) राज्य सरकारला राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमाचे उपबंध, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रातील निर्दिष्ट करण्यांत येईल अशा उद्योगधंद्याच्या बाबतीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून लागू असण्याचे बंद होईल; आणि त्यानंतर त्या तारखेस ह्या अधिनियमाचे उपबंध, अशा क्षेत्रातील त्या उद्योगधंद्यास लागू असण्याचे बंद होईल, आणि त्यानंतर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध, जणु काही अशा क्षेत्रातील उक्त उद्योगधंद्याच्या संबंधात महाराष्ट्र अधिनियमाद्वारे हा अधिनियम त्यावेळी रद्द करण्यात आला होता असे समजून, अशा बंद होण्याच्या बाबतीत लागू होतील.

(६) या कलमाच्या पूर्ववर्ती उपबंधात तरतूद केलेल्या रीतीने, सर्वसाधारणपणे कोणत्याही उद्योगधंद्यास किंवा कोणत्याही क्षेत्रात, हा अधिनियम लागू करण्यात आल्यानंतर, या अधिनियमान्वये केलेले किंवा काढलेले किंवा जे या अधिनियमान्वये केल्याचे किंवा काढल्याचे समजण्यात येईल असे आणि अशा रीतीने कोणत्याही उद्योगधंद्यास अधिनियम लागू करण्याच्या निकटपूर्वी राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलांत असलेले सर्व नियम, विनियम, आदेश आणि अधिसूचना ह्या [ मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरुस्ती), अधिनियम, १९६४, याद्वारे दुरुस्ती केलेल्या मुख्य अधिनियमाच्या उपबंधाशी जेथवर ते विसंगत नसतील तेथवर ] योग्यरीत्या त्या रद्द करण्यांत किंवा त्यांत दुरुस्ती करण्यांत येईपर्यंत, सर्वसाधारणपणे त्या उद्योगधंद्यासही किंवा यथास्थिती अशा क्षेत्रात सुद्धा लागू होतील.".

[...न १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ ...च्या कलम ... ची दुरुस्ती.]

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(अ) खंड (११) मधील "मुख्य समेट अधिकारी" या शब्दानंतर "अपर मुख्य समेट अधिकारी" हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(ब) खंड (१३) मध्ये,—

(१) उपखंड (ब) मध्ये, "बडतर्फ करण्यात आले आहे किंवा कामावरून काढून टाकण्यात आले आहे" या मजकुराऐवजी "बडतर्फ करण्यात आले आहे, सेवामुक्त करण्यात आले आहे किंवा कामावरून कमी करण्यात आले आहे किंवा ज्याच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि शेवटी "बडतर्फ करण्यापूर्वी किंवा कामावरून काढून टाकण्यापूर्वी" या मजकुराऐवजी "बडतर्फ करण्यापूर्वी, सेवामुक्त करण्यापूर्वी किंवा यथास्थिती नोकरीवरून कमी करण्यापूर्वी किंवा सेवा समाप्त करण्यापूर्वी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) उपखंड (१) मध्ये, "(भत्ते वगळून) दरमहा साडेतीनशे रुपये किंवा अधिक मूळ वेतन मिळविणारा" या मजकुराऐवजी "दरमहा पाचशे पन्नास रुपयांपेक्षा अधिक वेतन मिळविणारा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(क) खंड (२३) मध्ये,—

(१) "कोणतेही क्षेत्र" या मजकुरानंतर "(संपूर्ण राज्य समाविष्ट करून)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि

(२) "अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता" या मजकुरानंतर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"किंवा निरनिराळ्या उद्योगधंद्यांकरिता ;" ;

(ड) खंड (२५) मध्ये,—

(१) "दोन आणे" या मजकुराऐवजी "पंचवीस पैसे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) परंतुकातील "अशा वेळेच्या निकटपूर्वीच्या तीन कॅलेंडर महिन्यांची किंवा त्याहून अधिक मुदतीची" या मजकुराऐवजी "अशा वेळेच्या निकटपूर्वीच्या सहा महिन्यांच्या मुदतीत, तीन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(इ) खंड (३१) मध्ये, "व तीत" ह्या शब्दानंतर "अपर निबंधक, आणि" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(फ) खंड (३९) मध्ये उपखंड (६) ऐवजी पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईल :—
"(६) द्यावयाचे उपदान, कोणतेही असल्यास.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मधील "महाराष्ट्र राज्याच्या सबंध मुंबई क्षेत्रासाठी" या मजकुराऐवजी "सबंध महाराष्ट्र राज्यासाठी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (१) नंतर, पुढील नवीन पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१-अ) राज्य सरकारला, तशाच अधिसूचनेद्वारे, सबंध राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी एक किंवा अधिक अपर संघ निबंधक नेमण्याचा अधिकार आहे. अपर संघ निबंधकाने ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वयें, राज्य सरकारला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करील त्याप्रमाणे निबंधकाच्या अधिकारांचा वापर केला पाहिजे व त्याची कर्तव्यें पार पाडली पाहिजेत.

(१-ब) राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत निर्दिष्ट करील अशा बाबी खेरीजकरून अपर निबंधक हा निबंधकास अधीन असणार नाही." ;

(क) सामासिक टीपेत "निबंधक" या शब्दानंतर "अपर निबंधक" हे शब्द दाखल करण्यात येतील."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यांच्या कलम ५ ची दुरुस्ती.

६. मुख्य अधिनियमाचे कलम ६ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रावर" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र राज्यावर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (१) नंतर, पुढील नवीन पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१-अ) राज्य सरकारला, सबंध राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी एक किंवा अधिक अपर मुख्य समेट अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे. अपर मुख्य समेट अधिकाऱ्याने ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ह्या बाबतीत निर्दिष्ट करील त्याप्रमाणे मुख्य समेट अधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर केला पाहिजे व त्याप्रमाणे त्याची कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.

(१-ब) राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे ह्या बाबतीत निर्दिष्ट करील अशा बाबी खेरीज करून, अपर मुख्य समेट अधिकारी हा मुख्य समेट अधिकाऱ्यास अधीन असणार नाही."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ६ ची दुरुस्ती.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम १३, मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "शेकडा पंधराहून कमी नाहीत" या मजकुराऐवजी "शेकडा पंचवीसहून कमी नाहीत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (३) नंतर पुढील नवीन पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(४) या कलमांत काहीही असले तरी, जर एखादा संघ प्रातिनिधिक संघ म्हणून, पात्रता-प्राप्त संघ म्हणून किंवा यथास्थिति प्राथमिक संघ म्हणून नोंदणीसाठी नवीन अर्ज करील तर, अशा नोंदणीसाठी पूर्वी करण्यात आलेला अर्ज निबंधकाकडून अंतीमरीत्या निकालात काढण्यात येईपर्यंत निबंधकाने असा अर्ज स्वीकारता कामा नये."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १३ ची दुरुस्ती.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील परंतुकातील, तिसरे असे की, या मजकुरात,—

(अ) "नोंदणीसाठी" या मजकुरानंतर "त्याच कॅलेंडर महिन्यात" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "अर्ज करतील तेव्हा" या मजकुरानंतर "त्यांनी ज्या कॅलेंडर महिन्यात अर्ज केला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या निकटपूर्वीच्या तीन महिन्यांच्या कालावधिसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १४ ची दुरुस्ती.

(क) "नोंदण्यांत आला पाहिजे" ह्या मजकुराच्या शेवटी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :—

"आणि त्याच कॅलेंडर महिन्यात प्रथम मिळालेल्या अर्जाची निबंधकाकडून विल्हेवाट लावण्यात येईपर्यंत, नंतरच्या कोणत्याही महिन्यात नोंदणीसाठी आलेले कोणतेही अर्ज विचारात घेता कामा नये.".

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १६ ची दुरुस्ती.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) यात,—

(१) "निबंधकाने" या मजकुरानंतर "जर नोंदणी केलेल्या संघाची ज्या तारखेस नोंदणी करण्यात आली असेल त्या तारखेपासून दोन वर्षांची मुदत संपली असेल तर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) शेवटी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल,—

"परंतु संघाच्या पूर्वीच्या अर्जाची विल्हेवाट लावल्याच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्याशिवाय निबंधकाने संघांच्या नोंदणीसाठी कोणताही अर्ज स्वीकारता कामा नये.";

(ब) पोट-कलम (३) मध्ये "अर्जदार संघ नोंदला पाहिजे" या मजकुरानंतर "आणि त्याने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणीचे प्रमाण पत्र दिले पाहिजे."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २० ची दुरुस्ती.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम २० मधील त्याच्या सामासिक टीपेतील "नोंदणी रद्द करण्याबाबत" हा मजकूर वगळण्यांत येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २३ ची दुरुस्ती.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) यात,—

(१) खंड (१) मधील "चार आण्यापेक्षा" या मजकुराऐवजी "पन्नास पैशापेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) खंड (६) मध्ये,—

(अ) "संप मंजूर करण्यात येणार नाही किंवा संपाचा अवलंब करण्यात येणार नाही" या मजकुराऐवजी "संप मंजूर करण्यात येणार नाही, त्याचा अवलंब करण्यात येणार नाही किंवा त्यास पाठिंबा देण्यात येणार नाही ;" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "उपाय करून पाहिल्यावाचून" या शब्दांनंतर "किंवा कलम ९७, पोट-कलम (१), खंड (ह) याच्या परंतुकात उल्लेख केलेली परिस्थिती असल्यावाचून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) खंड (७) मध्ये "किंवा त्याचा अवलंब करण्यात येणार नाही" ह्या मजकुराऐवजी "त्याचा अवलंब करण्यात येणार नाही किंवा त्यास पाठिंबा देण्यात येणार नाही" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) खंड ७ नंतर पुढील खंड दाखल करण्यात येईल,—

"(८) 'मंद गतीने काम करा' यासारख्या गोष्टी मंजूर करता कामा नये, त्याचा अवलंब करता कामा नये किंवा त्यास पाठिंबा देता कामा नये ; " ;

(५) परंतुकानंतर पुढील आणखी परंतुक दाखल करण्यात येईल,—

"तसेच,—

(अ) संघाने मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी पूर्वी केलेल्या अर्जाची निबंधकाने अंतीमरीत्या विल्हेवाट लावण्यात येईपर्यंत निबंधकाने कोणत्याही संघाचा नवीन अर्ज स्वीकारता कामा नये ;

(ब) जेव्हा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील एकाच उद्योगधंद्याच्या बाबतीत, मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती परिपूर्ण करणारे दोन किंवा अधिक संघ त्याच कॅलेंडर महिन्यात अर्ज करतील तेव्हा, ज्या कॅलेंडर महिन्यात त्यांनी अर्ज केला असेल त्या महिन्याच्या निकटपूर्वीच्या कॅलेंडर महिन्यात त्या उद्योगधंद्यांतील अधिकतर कामगार ज्या संघाचे सदस्य असतील त्या संघाची मान्यताप्राप्त यादीत नोंदणी केली पाहिजे ;

(क) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही संघाकडून कोणताही अर्ज मिळाल्यानंतर, जर इतर कोणताही संघ किंवा इतर कोणतेही संघ त्याच स्थानिक क्षेत्रातील त्याच उद्योगधंद्यासाठी मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी अर्ज नंतरच्या कोणत्याही कॅलेंडर महिन्यांत करतील तर, निबंधकाकडून पहिल्या अर्जाची विल्हेवाट लावण्यांत आल्याशिवाय असा अर्ज किंवा असे अर्ज विचारात घेता कामा नये.

(ब) पोट-कलम (२) मध्ये "दोन आणे" या शब्दाऐवजी "पंचवीस पैसे" व चार आण्यापेक्षा" या शब्दांऐवजी "पन्नास पैशापेक्षा" हे शब्द दाखल करण्यात यावेत ;

(क) पोट-कलम (४) मध्ये,—

(१) "अशा उद्योगधंद्यासाठी" या मजकुरापूर्वी "त्या स्थानिक क्षेत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात यावा ;

(२) "त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर" या मजकुराऐवजी, "त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्या स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगधंद्यात मान्यताप्राप्त संघापेक्षा अर्ज करणाऱ्या संघाचे, ज्या महिन्यात असा अर्ज करण्यात आला त्या कॅलेंडर महिन्याच्या निकटपूर्वीच्या महिन्यात अधिक सदस्य आहेत अशी त्याची खात्री होईल. तर", हा मजकूर दाखल करण्यात यावा ;

(३) शेवटी पुढील परंतुक जादा दाखल करण्यात यावे :—

"परंतु निबंधकाने,—

(अ) मान्य केलेल्या यादीत मान्यताप्राप्त संघाची नोंदणी झाल्यापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्याखेरीज असा कोणताही अर्ज ;

(ब) निबंधकाने संघाचा पूर्वीचा अर्ज निकालात काढल्याच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्याखेरीज अशा संघाचा कोणताही नवीन अर्ज ;

स्वीकारता कामा नये.".

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम २३ (अ) नंतर पुढील नवीन कलम दाखल करण्यात यावे :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात नवीन कलम २३ (ब) दाखल करणे.

"२३(ब) कलम २३, पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद समेट अधिनियम, १९४७, या अन्वये कोणत्याही उद्योगधंद्याच्या बाबतीत, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात मान्यताप्राप्त संघ म्हणून नोंदणी करण्यात आलेला कोणताही संघ हा, मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४, अन्वये त्या उद्योगधंद्याच्या बाबतीत त्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्य केलेल्या यादीत नोंदणी करण्यात आलेला मान्यताप्राप्त संघ असल्याचे समजण्यात येईल.". सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ यान्वये मान्य केलेला संघ हा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त संघ राहील.

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २४ ची सुधारणा.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,—

(अ) खंड (२)ला पुढील परंतुक जोडण्यात येईल :—

"परंतु, निबंधकाने, मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभापासून सहा महिन्याच्या मुदतीपर्यंत अशा प्रारंभापूर्वी मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संघाचे नाव, अशा संघाने उक्त अधिनियमान्वये कलम २३ मध्ये नवीन दाखल केलेल्या जादा शर्तींचे पालन केले नाही या कारणावरून काढून टाकता कामा नये." ;

(ब) शेवटी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.**—खंड (२) च्या प्रयोजनासाठी कलम २३ ब अन्वये जो संघ मान्यताप्राप्त संघ समजण्यात येत असेल अशा संघाने औद्योगिक संबंध (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४, याच्या प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत कलम २३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबीसाठी तरतूद करणारे नियम केले नाही तर, त्यामुळे अशा संघाने कलम २३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात कसुरी केल्याचे समजण्यात येईल.".

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात नवीन कलम २४-अ दाखल करणे.

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम २४ नंतर पुढील नवीन कलम दाखल करण्यात यावे :—

विभाग ४ अन्वये निबंधकाच्या आदेशाविरुद्ध औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

"२४-अ (१) निबंधकापुढे असलेल्या कारवाईतील कोणत्याही पक्षास, या विभागान्वये त्याने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत औद्योगिक न्यायालयाकडे अशा आदेशाविरुद्ध अपील करता येईल :

परंतु, औद्योगिक न्यायालयात अशी मुदत संपल्यानंतर पुरेशा कारणावरून असे कोणतेही अपील दाखल करून घेता येईल.

(२) औद्योगिक न्यायालयास अपिलाचे ज्ञापन आणि ज्या निर्णयाविरुद्ध अपील केले असेल तो निर्णय पाहिल्यानंतर जर त्यास असा निर्णय कायद्याचे विरुद्ध दिला असल्याचे किंवा तो अन्यथा चूक असल्याचे दिसून येईल तर त्यास पोट-कलम (१) खालील अपील दाखल करून घेता येईल.

(३) औद्योगिक न्यायालयास अपिलात निबंधकाने दिलेला कोणताही आदेश कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो रद्द करता येईल. तसेच त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे परिणामभूत आदेश देता येतील. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात आली पाहिजे.".

[स]न १९४७चा [मु]बई [अ]धिनियम [क्र]मांक ११ [या]च्या कलम [२]७ ची [दु]रुस्ती.

१५. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मधील पोट-कलम (१), खंड (अ) यात,—

(१) "उद्योगधंद्यातील कोणत्याही मालकाच्या" या मजकुरापूर्वी "त्या स्थानिक क्षेत्रातील" हा मजकूर, आणि

(२) "अशा उद्योगधंद्यातील" या मजकुरापूर्वी "त्या स्थानिक क्षेत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

[स]न १९४७चा [मुं]बई अधि[नि]यम क्रमांक [१]१यात नवीन [क]लम २७-अअ [दा]खल करणे.

१६. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ नंतर पुढील नवीन कलम दाखल करण्यात यावे :—

"२७-अअ. या अधिनियमात काहीही असले तरी या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, अधिसूचित करण्यात आलेल्याएखाद्या स्थानिक क्षेत्रात किंवा अनेक क्षेत्रात जर कोणताही फेरबदल करण्यात आला तर, मालकांचा मान्यताप्राप्त संघ फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्यताप्राप्त संघ म्हणून चालू राहणे.

(अ) अशा संबंधीत एखाद्या वा अनेक स्थानिक क्षेत्रात फेरबदल करण्याच्या निकटपूर्वी कोणत्याही उद्योगधंद्याचे, कलम २७, पोट-कलम (२) अन्वये ह्या अधिनियमाखाली प्रतिनिधित्व करण्याचा हक्क असलेल्या मान्यताप्राप्त संघास ; किंवा

(ब) कलम २७, पोट-कलम (२) अन्वये प्रतिनिधित्व करण्यासाठी मालकांचे एकाहून अधिक मान्यताप्राप्त संघ असतील तर त्या बाबतीत, त्याच उद्योगधंद्याशी संबंधीत असलेल्या ज्या मालक संघाचे अधिक सदस्य असतील त्या संघास ;

असा फेरबदल ज्या तारखेस करण्यात आला त्या तारखेपासून १२ महिन्याच्या मुदतीसाठी. किंवा जर अशा मुदतींत अशा संघाकडून किंवा फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्रातील इतर कोणत्याही संघाकडून अर्ज करण्यात आला तर असा अर्ज राज्य सरकारकडून निकालात काढण्यात येईपर्यंत, यथास्थिती फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्राचे किंवा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार राहील."

१७. मुख्य अधिनियमाच्या कलम २७-अ मधील "व ३३" या ऐवजी "३३ व ३३-अ" हे शब्द व आकडे दाखल करण्यात येतील. सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २७-अ ची दुरुस्ती.

१८. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मधील, "पुढील संघ व इसम" या मजकुरापूर्वी "कलम ३३-अ च्या उपबंधास अधीन राहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३० ची दुरुस्ती.

१९. मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मधील परंतुकात,— सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३२ ची दुरुस्ती.

(अ) "परंतु" या शब्दानंतर "कलम ३३-अ च्या उपबंधास अधीन राहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) "अशा चालू असलेल्या कोणत्याही कामात" या मजकुरानंतर "(कामगार न्यायालयात किंवा औद्योगिक न्यायालयात एखाद्या कामगारास बडतर्फ केल्याबाबत, सेवामुक्त केल्याबाबत, काढून टाकल्याबाबत, कमी केल्याबाबत, त्याच्या सेवा समाप्त केल्याबाबत किंवा पदावरून तात्पुरते दूर केल्याबाबत दिलेल्या अदेशाच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्यतेबद्दल जे कामकाज चालू असेल ते खेरीज करून)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०. मुख्य अधिनियमाचे कलम ३३ यात,— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३३ ची दुरुस्ती.

(अ) खंड (ब) मधील "किंवा कलम ७२ अन्वये पाठविलेल्या कोणत्याही औद्योगिक विवादाचा निर्णय करण्यासाठी" हा मजकूर वगळण्यात येईल.

(ब) दुसऱ्या परंतुकातील,—

(१) "तसेच" या शब्दानंतर "कलम ३३-अ च्या उपबंधास अधीन राहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) "या अधिनियमान्वये चालू असलेल्या ज्या कोणत्याही कामात" या मजकुरानंतर "(कामगार न्यायालयात किंवा औद्योगिक न्यायालयात एखाद्या कामगारास बडतर्फ केल्याबाबत, सेवामुक्त केल्याबाबत, काढून टाकल्याबाबत, कमी केल्याबाबत, त्याच्या सेवा समाप्त केल्याबाबत किंवा तात्पुरते कामावरून दूर केल्याबाबत दिलेल्या आदेशाच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्येतेबद्दल जे कामकाज चालू असेल ते खेरीज करून)" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(क) दुसऱ्या परंतुकानंतर पुढील आणखी परंतुक दाखल करण्यांत येईल.

"तसेच, उपरिनिर्दिष्ट तरतुदीखेरीज करून (प्रतिनिधिक संघ किंवा विधी-व्यवसायी यांच्या व्यतिरिक्त इतर) कोणत्याही इसमास न्यायालयाच्या परवानगीशिवाय ह्या अधिनियमाखाली कोणत्याही न्यायालयात चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत कामगाराच्या वतीने हजर राहण्याची परवानगी देता येणार नाही."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ ाच्या कलम ३ अ ची रुस्ती.

२१. मुख्य अधिनियमाच्या विभाग ५ मध्ये कलम ३३ नंतर पुढील नवीन कलम शेवटी दाखल करण्यांत येईल.

ा कार्य– हीत काम- रांमध्ये वाद असेल ा कार्य- हीत ज्यांना र राहता ल ते इसम.

"३३ अ (१). कामगार कामगारांमध्ये असलेला जो कोणताही विवाद कलम ७२ अन्वये कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे लवादासाठी सोपविण्यात आला असेल अशा विवादात पक्षकार असलेल्या सर्व इसमांना अशा न्यायालयापुढील कार्यवाहीत हजर राहण्याचा व काम करण्याचा अधिकार असेल :

परंतु, प्रत्येक पक्षाच्या कामगारांची संख्या पाचहून अधिक असेल तर त्या बाबतीत अशा कामगारांनी विहित केलेल्या पद्धतीनें त्यांच्या वतीने हजर राहण्यासाठी व काम करण्यासाठी आपणामधून दोन इसम निवडून दिले पाहिजेत.

(२) जर प्रातिनिधिक संघास अशा विवादात आपली बाजू मांडण्याची इच्छा असेल तर त्यास न्यायालयाकडे अर्ज केल्यानंतर अशा न्यायालयापुढे आपली बाजू मांडता येईल.".

१९४७ ुंबई नियम क ११ ा कलम ी ी.

२२. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४, पोट-कलम (६), खंड (ब) च्या परंतुकातील "अशा संघानी विनंती केली नसेल तर" या मजकुराऐवजी "संघाशी विचारविनिमय केल्याशिवाय" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

९४७ ुंबई ियम ११ कलम

२३. मुख्य अधिनियमाचे कलम ३६ च्या पोट-कलम (१) मधील "कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये कामगार आयुक्ताने ठरविलेल्या कोणत्याही स्थायी आदेशामुळे ज्यांचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही इसमास" या मजकुराऐवजी "या विभागाखाली कामगार आयुक्ताच्या निर्णयामुळे ज्याचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही इसमास" हा मजकूर दाखल करावा.

२४. मुख्य अधिनियमाचे कलम ४२ मध्ये, पोट-कलम (४) यात,—

(अ) "निर्दिष्ट केलेली कोणतीही औद्योगिक बाब" या मजकुरानंतर "(त्यातील बाब (५) खेरीजकरून)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) "कामगार न्यायालयाकडे अर्ज केला पाहिजे". या मजकुरानंतर आणि "अनुसूचित ३ च्या बाब (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबीत जो फेरबदल करावयाची इच्छा असेल त्या कोणत्याही बाबतीत औद्योगिक न्यायालयाकडे अर्ज केला पाहिजे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम ११ याच्या कलम ४२ ची दुरुस्ती.

२५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये, पोट-कलम (२) यातील "सात दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी "तीस दिवसांच्या आत" हा मजकूर दाखल करावा.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४३ ची दुरुस्ती.

२६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मधील पोट-कलम (२) यातील खंड (३), (४) व (५) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(३) लवादी किंवा औद्योगिक न्यायालय याचा निवाडा किंवा यथास्थिती वेतन मंडळाचा निर्णय अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी जर कोणतीही तडजोड झाली नाही तर त्या बाबतीत."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४६ ची दुरुस्ती.

२७. मुख्य अधिनियमाचे कलम ६४ मधील खंड (ब), उपखंड (२) मधील "पाठविण्यात आली असेल" या मजकुरानंतर "किंवा कलम ८६-क किंवा ८६-कक अन्वये वेतन मंडळाकडे पाठविण्यात आली असेल". हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ६४ ची दुरुस्ती.

२८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ नंतर पुढील नवीन कलम दाखल करण्यात येईल :—

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात नवीन कलम ७३-अअ दाखल करणे.

"७३अअ. एखाद्या उद्योगधंद्यातील किंवा त्याच्या विभागातील कोणत्याही उपक्रमाशी संबंधित कामगार
असलेला औद्योगिक विवाद कलम ७२ किंवा ७३ अन्वये कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक किंवा औद्यो-
न्यायालयाकडे पाठविण्यात आला असेल किंवा पाठवावयाचा असेल आणि राज्य सरकारकडे या गिक न्याया-
बाबतीत करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा राज्य सरकारच्या मते, त्या उद्योगधंद्यातील लयाकडे
किंवा त्याच्या विभागातील तशाच स्वरूपाच्या उपक्रमाचा किंवा उपक्रमांच्या गटाचा किंवा वर्गाचा सोपविण्यात
अशा विवादात हितसंबंध असणे संभवनीय असेल किंवा त्यामुळे त्याच्यावर परिणाम झाला असेल तर आलेल्या

बाबीत इतर उपक्रमांच्या बाबी समाविष्ट करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

राज्य सरकारास असा उल्लेख करतेवेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळीं परंतु निवाडा देण्यापूर्वी त्या संदर्भात अशा उपक्रमाचा, उपक्रमांच्या गटाचा किंवा वर्गाचा किंवा त्याच्या भागाचा समावेश करता येईल मग असा समावेश करतांना त्या कारखान्यात, उपक्रमांच्या वर्गांत किंवा गटात त्याच्या विभागात कोणताही विवाद अस्तित्वांत असो वा नसो किंवा विवाद होण्याची शक्यता असो वा नसो."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७३-अ ची दुरुस्ती.

२९. मुख्य अधिनियमाचे कलम ७३-अ यात—

(अ) "या अधिनियमात काहीही असले तरी" या मजकुरानंतर "एखाद्या मालकास किंवा" हा मजकूर दाखल करण्यात यावा ;

(ब) परंतुकातील खंड (२) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात यावा :—

"(२) जेव्हां नोंदणी केलेल्या संघाने किंवा यथास्थिती मालकाने असा विवाद या अधिनियमान्वये लवादीसाठी सादर करण्याविषयी आपली तयारी समेट अधिकाऱ्यापुढे लेखी दर्शविली असेल, आणि मालकाने किंवा यथास्थिती संघाने तसे करण्यास कबुली दिली नसेल तेव्हां".

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७५ ची दुरुस्ती.

३०. मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये "निवाडा" या शब्दापूर्वी कलम ११८ ब मध्ये जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीज करून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७८ ची दुरुस्ती.

३१. मुख्य अधिनियमाचे कलम ७८ मधील पोट-कलम (१) यात—

(अ) परिच्छेद अ च्या खंड (अ) मधील उपखंड (३) मध्ये "निर्दिष्ट केलेली कोणतीही बाब" या मजकुरानंतर "(त्यातील बाब (५) खेरीज करून)" हा मजकूर दाखल करण्यांत येईल ;

(ब) परिच्छेद क मधील खंड (अ) मध्ये "तो मागे घेण्यास, किंवा" या मजकुरानंतर "कोणत्याही कार्यवाहीतील ज्या कोणत्याही फेरदलाच्या कायदेशीरपणाची बाब ही वादग्रस्त मुद्दा असेल तर अंतिम निर्णय होईपर्यंत तो तात्पुरता मागे घेण्यास" हा मजकूर समाविष्ट करण्यांत येईल ;

(क) परिच्छेद (क) नंतर पुढील नवीन परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

"(ड) जर मालकाने एखाद्या कामगारास पदच्युत करण्यासंबंधी, सेवामुक्त करण्यासंबंधी त्यास काढून टाकण्यासंबंधी त्यास कामावरून कमी करण्यासंबंधी किंवा त्याची सेवा कमी करण्यासंबंधी किंवा त्यास कामावरून तात्पुरते दूर करण्यासंबंधी काढलेला आदेश"—

(१) कामगाराने केलेल्या चुकीमुळे किंवा दुर्वर्तनामुळे काढलेला असेल आणि जी चूक असा आदेश काढल्याच्या तारखेच्या सहा महिने आधी मालकांच्या निदर्शनास आली असेल ; किंवा

(२) या अधिनियमाच्या किंवा अशा कामगारास अंमलात असलेले जे कोणतेही स्थायी आदेश लागू असतील त्यास्थायी आदेशातील कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून असा आदेश काढलेला असेल, किंवा—

(३) अन्यथा तो अयोग्य किंवा अवैध असेल तर,

(अ) कामगारास तावडतोब किंवा त्याने याबाबतीत निर्दिष्ट केलेल्या तारखेपर्यंत पुन्हा नियुक्त करण्यास आणि त्यास, बडतर्फ करण्यासंबंधी, सेवामुक्त करण्यासंबंधी, काढून टाकण्यासंबंधी त्यास कामावरून कमी करण्यासंबंधी किंवा त्याची सेवा समाप्त करण्यासंबंधी किंवा यथास्थिती, त्याच पदावरून तात्पुरते दूर करण्यासंबंधी दिलेल्या अशा आदेशाच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि ज्या तारखेस कामगार न्यायालय त्यास पुन्हा नियुक्त करण्याचा आदेश देईल त्या तारखेस किंवा पुन्हा नियुक्त केल्याच्या तारखेस, यापैकी जी तारीख नंतरची असेल त्या तारखेस संपणाऱ्या कालावधीचे वेतन देण्यास, किंवा

(ब) कामगारास वेतनाखेरीज (असे वेतन त्यास बडतर्फ केल्याच्या, सेवामुक्त केल्याच्या किंवा काढून टाकल्याच्या, त्यास कामावरून कमी केल्याच्या किंवा त्याची सेवा समाप्त केल्याच्या तारखेस सुरू होणाऱ्या आणि ज्या तारखेस कामगार न्यायालय अशी रक्कम देण्याचा आदेश देईल त्या तारखेस संपणाऱ्या कालावधीचे वेतन असेल ) नुकसान भरपाईच्या रूपाने चार हजार रुपयांहून अधिक नसेल अशी रक्कम देण्यास मालकास फर्माविण्याचा अधिकार आहे ; मात्र असे करतांना नोकरी जाणे व त्यानंतर योग्य नोकरी मिळण्याची शक्यता या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. "

३२. मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ मध्ये,—" नुकसान झालेल्या इसमाने " या मजकुरानंतर " किंवा प्रातिनिधिक संघाने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८२ ची दुरुस्ती.

३३. मुख्य अधिनियमाच्या कलम ८३-अ नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल— सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात ८३-ब हे नवीन कलम समाविष्ट करणे.

" ८३–ब. कामगार न्यायालयास, त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी दिला पाहिजे यासंबंधी निदेश देण्याचा अधिकार असेल : खर्चासंबंधी निवाडा देण्याचा कामगार न्यायालयाचा अधिकार.

परंतु, कोणत्याही पक्षाने नेमलेल्या कोणत्याही विधी सल्लागाराच्या कामांबद्दल असा कोणताही खर्च देण्यासंबंधी निदेश देता येणार नाही. "

३४. मुख्य अधिनियमाच्या कलम ८५ नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात ८५-अ हे नवीन कलम समाविष्ट करणे.

कामकाज वर्ग करण्याचा औद्योगिक न्यायालयाचा अधिकार.

"८५-अ. औद्योगिक न्यायालयास, लेखी आदेशाद्वारे व त्यात नमूद करण्यात येतील अशा कारणावरून, कामगार न्यायालयापुढे अनिर्णित असलेले या अधिनियमाखालील कोणतेही कामगकाज काढून घेता येईल व असे कामकाज निकालात काढण्यासाठी ते दुसऱ्या कामगार न्यायालयाकडे वर्ग करता येईल; आणि ज्या कामगार न्यायालयाकडे ते कामकाज अशा रीतीने वर्ग केले असेल त्या कामगार न्यायालयास ते कामकाज निकालांत काढतां येईल परंतु कामकाज वर्ग करण्यासंबंधीच्या आदेशातील कोणत्याही विशेष निदेशास अधीन राहून, त्यास ते कामकाज नव्याने सुरू करता येईल किंवा ज्या अवस्थेला ते अशा रीतीने वर्ग केले असेल त्या अवस्थेपासून सुरू करता येईल."

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याची कलमे ८६-अ. व ८६-ल यात दुरुस्ती करणे.

३५. मुख्य अधिनियमाची कलमे ८६-अ व ८६-ल या कलमांतील "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाकरितां" या शब्दांच्या ऐवजी, "राज्याकरितां" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८६-कक ची दुरुस्ती.

३६. मुख्य अधिनियमाचे कलम ८६-कक यात,—

(अ) "या अधिनियमाच्या कोणत्याही इतर उपबंधात काहीही असले तरी" या शब्दानंतर "मालकास किंवा" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील;

(ब) परंतुकात, खंड (२) ऐवजी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(२) जेव्हां नोंदलेल्या संघाने किंवा यथास्थिति मालकाने असा विवाद या अधिनियमान्वये लवादासाठी सादर करण्याविषयी आपली तयारी समेट अधिकाऱ्यापुढे लेखी दर्शविली असेल आणि तसे करण्यास मालक किंवा यथास्थिति संघ कबूल नसेल तेव्हां;".

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८६-ह ची दुरुस्ती.

३७. मुख्य अधिनियमाचे कलम ८६–ह यात खंड (अ) ऐवजी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(अ) औद्योगिक विवादातील सर्व पक्ष;".

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८७ ची दुरुस्ती.

३८. मुख्य अधिनियमाचे कलम ८७, याच्या खंड (अ) मध्ये,—

(अ) उपखंड (१) मधील "किंवा ४४" हा शब्द व आकडा याऐवजी "२४-अ किंवा ४४" हा शब्द व आकडा समाविष्ट करण्यात येईल;

(ब) उपखंड (२) नंतर पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(२–अ) अनुसूची ३ च्या बाब (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबींच्या संबंधांत कोणताही कामगार किंवा प्रातिनिधिक संघ जो फेरफार करू इच्छित असेल अशा कोणत्याही फेरफारासंबंधीच्या विवादांचा निर्णय करणे;".

३९. मुख्य अधिनियमाचे कलम ९४ यात, खंड (अ) ऐवजी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९४ ची दुरुस्ती.

" (अ) औद्योगिक विवादातील सर्व पक्ष; ".

४०. मुख्य अधिनियमाचे कलम ९५ याच्या पोट-कलम (१) मधील "नोंदलेला संघ" या शब्दांऐवजी "कामगारांचा प्रतिनिधि" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील. सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९५ ची दुरुस्ती.

४१. मुख्य अधिनियमाचे कलम ९७ यात, पोट-कलम (१) मधील खंड (ह) मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९७ ची दुरुस्ती.

"परंतु, जेव्हा संघाने औद्योगिक विवाद कलम ५८ च्या पोट-कलम (६) अन्वये लवादासाठी सादर करण्याविषयी आपली तयारी लेखी दर्शविली असेल, आणि

(अ) मालकाने ती स्वीकारली नसेल, किंवा

(ब) मालकाने ती स्वीकारली असेल परंतु लवादाची निवड अमान्य करून लवादाचा नामनिर्देश न करता तो विवाद लवादासाठी सादर करण्यास तो कबूल नसेल,

आणि त्यानंतर तो विवाद कलम ७३-अ अन्वये औद्योगिक न्यायालयाकडे लवादासाठी पाठवण्यात आला असेल तेव्हा, या खंडातील कोणतीही गोष्ट कोणत्याही संपास लागू होणार नाही.".

४२. मुख्य अधिनियमाचे कलम ९८, पोट-कलम (१) मधील खंड (ग) मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९८ ची दुरुस्ती.

"परंतु जेव्हा मालकाने औद्योगिक विवाद कलम ५८ च्या पोट-कलम (ब) अन्वये लवादासाठी सादर करण्याविषयी आपली तयारी लेखी दर्शविली असेल, आणि

(अ) संघाने ती स्वीकारली नसेल ; किंवा

(ब) संघाने ती स्वीकारली असेल परंतु लवादाची निवड अमान्य करून, लवादाचा नामनिर्देश न करता तो विवाद लवादासाठी सादर करण्यास तो कबूल नसेल,

आणि त्यानंतर, तो विवाद कलम ७३-अ अन्वये औद्योगिक न्यायालयाकडे लवादासाठी पाठवण्यात आला असेल तेव्हा, या खंडातील कोणतीही गोष्ट टाळेबंदीस लागू होणार नाही.".

४३. मुख्य अधिनियमाचे कलम १०० यात पुढील नवीन पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०० ची दुरुस्ती.

" (४) चौकशी न्यायालयास, या अधिनियमान्वये त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामकाजातून उद्भवणारा कोणताही विधिविषयक प्रश्न औद्योगिक न्यायालयाकडे सोपवता येईल. अशा कामकाजातील चौकशी न्यायालयाचा कोणताही निष्कर्ष औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार असला पाहिजे.".

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०१ ची दुरुस्ती.

४४. मुख्य अधिनियमाचे कलम १०१ यात,—

(अ) पोट-कलम (१), खंड (ग) मधील, "किंवा त्यात सामील झाला आहे" या मजकुराऐवजी "किंवा त्यात सामील झाला आहे किंवा त्यास चिथावणी दिली आहे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) नंतर पुढील नवीन पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"(२-अ) कोणत्याही मालकाने कामगार न्यायालयाच्या स्पष्ट लेखी परवानगीवाचून कोणत्याही संरक्षित कामगारास बडतर्फ करता कामा नये, सेवामुक्त करता कामा नये किंवा खालच्या पदावर आणता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही उद्योगधंद्याच्या संबंधात "संरक्षित कामगार" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जो कामगार त्या उद्योगधंद्याशी संबंधित असलेल्या संघाचा पदाधिकारी असून या अधिनियमान्वये केलेल्या नियमानुसार त्यास असा पदाधिकारी म्हणून मान्यता दिली असेल असा कोणताही कामगार, असा समजावा.

(२-ब) कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील प्रत्येक उद्योगधंद्यात, पोट-कलम (२-अ) च्या प्रयोजनाकरिता "संरक्षित कामगार" म्हणून मान्यता द्यावयाच्या संघाच्या अधिकाऱ्यांची संख्या ही कमीतकमी पाच संरक्षित कामगार व जास्तीत जास्त शंभर संरक्षित कामगार या संख्येस अधीन राहून, त्या उद्योगधंद्यात कामावर लावलेल्या एकूण कामगारांच्या शेकडा एक टक्क्याइतकी असेल ; आणि उपरोक्त प्रयोजनाकरिता, राज्य सरकारला, ज्या रीतीने कामगारांची निवड केली जाईल, व त्याना संरक्षित कामगार म्हणून ज्या रीतीने मान्यता दिली जाईल त्या रीतीसंबंधी तरतूद करण्याबाबत नियम करता येतील.";

(क) पोट-कलम (३) मधील "किंवा (२)" या ऐवजी, "(२) किंवा (२-अ)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०६ ची दुरुस्ती.

४५. मुख्य अधिनियमाचे कलम १०६, पोट-कलम (१) मध्ये "अवैध फेरफार करील" या मजकुराऐवजी "कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने जो फेरफार अवैध असल्याचा निर्णय दिला असेल किंवा जाहीर केले असेल असा फेरफार करील" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०७ ची दुरुस्ती.

४६. मुख्य अधिनियमाचे कलम १०७ यात, "जो कोणताही मालक" या शब्दांनंतर "कलम ३५ अन्वये लागू असलेल्या नमुनेवजा स्थायी आदेशाचे किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ११६-अ ची दुरुस्ती.

४७. मुख्य अधिनियमाचे कलम ११६-अ याच्या पोट-कलम (३) मध्ये, "निवाड्यात फेरफार करण्याचा अधिकार आहे" या मजकुराऐवजी "निवाड्यात भावीकालसापेक्ष किंवा भूतकालसापेक्ष रीतीने फेरफार करता येईल. तथापि, भूतकालसापेक्ष रीतीने कोणताही फेरफार केल्यास तो पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अर्जाच्या तारखेच्या आधी अंमलात येणार नाही" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४८. मुख्य अधिनियमाच्या कलम ११८-अ नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात ११८-ब हे नवीन कलम समाविष्ट करणे.

"११८-ब. (१) जेव्हा औद्योगिक न्यायालयापुढे किंवा कामगार न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत जर कोणताही पक्ष, सुनावणीची नोटीस त्याजवर योग्य रीतीने बजावण्यात आली असताना सुद्धा ती बाब सुनावणीस आली असता हजर राहिला नसेल तर न्यायालयास त्या बाबीची सुनावणी नंतरच्या तारखेपर्यंत तहकूब करता येईल किंवा एकपक्षीय कामकाज चालवून त्यास योग्य वाटेल असा निवाडा, आदेश किंवा निर्णय देता येईल. पक्ष हजर न झाल्याचे परिणाम.

(२) जेव्हा, पोट-कलम (१) अन्वये, कोणताही निवाडा, आदेश किंवा निर्णय एकपक्षीय देण्यात येईल तेव्हा, आपल्यावर अन्याय झालेला आहे असे समजणाऱ्या पक्षास, त्याची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, असा निवाडा, आदेश किंवा निर्णय रद्द करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल. आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणारा पक्ष हजर न होण्यास पुरेसे कारण होते अशी, औद्योगिक न्यायालयाची किंवा कामगार न्यायालयाची खात्री झाली तर, त्यास अशा रीतीने दिलेला निवाडा, आदेश किंवा निर्णय रद्द करता येईल आणि त्याबाबतीत कामकाज चालविण्यासाठी एखादी तारीख नेमता येईल :

परंतु विरुद्ध पक्षावर त्या संबंधीची नोटीस बजावण्यात आल्याशिवाय उपरोक्त अशा कोणत्याही अर्जावरून कोणताही निवाडा, आदेश किंवा निर्णय रद्द करता येणार नाही.".

४९. मुख्य अधिनियमाच्या कलम १२१ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यातील कलम १२१ ऐवजी नवीन कलम समाविष्ट करणे.

"१२१. मुंबई उद्योगधंदे विवाद समेट अधिनियम, १९३४, या याद्वारे रद्द करण्यात येत आहे.". सन १९३४चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ रद्द करणे.

५०. मुख्य अधिनियमाच्या कलम १२२ नंतर पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यांत नवीन कलम १२२अ समाविष्ट करणे.

अधिकार प्रदान करणे.

"१२२-अ. राज्य सरकारास राज्यपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार असेल की, ह्या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये, निदेशात निर्दिष्ट केलेल्या बाबींसंबंधी व त्यात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अटींस अधीन राहून त्याने चालवावयाचे अधिकार हे अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकाऱ्यास किंवा त्यास अधीन असलेल्या प्राधिकाऱ्यास देखील चालविता येतील.".

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १२३ ची दुरुस्ती.

५१. मुख्य अधिनियमाच्या कलम १२३ मध्ये,—

(अ) पोट-कलम (२) यांत,—

(१) खंड (ग) मधील "पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची फी" या मजकुरानंतर "पोट-कलम (३) खालील नोंदणीच्या प्रमाणपत्राचा नमुना" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (न-अ) मधील "व ४" या ऐवजी "४ व ५" हे शब्द व आकडे दाखल करण्यात येतील.

(ब) पोट-कलम (३) नंतर पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) ह्या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे मान्यता देतील किंवा नियम करू नये म्हणून मान्यता देतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, तो नियम अशा अधिसूचनेच्या तारखेपासून, यथास्थिती अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.".

सन १९४७चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ यात नवीन कलम १२३अ दाखल करणे.

५२. मुख्य अधिनियमाच्या कलम १२३ नंतर पुढील नवीन कलम दाखल करण्यात येईल :—

सन १९४७चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ रद्द करणे.

"१२३-अ. मध्य प्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद समेट अधिनियम, १९४७, हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे :

परंतु,—

(अ) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या अधिनियमाच्या उपबंधान्वये केलेली प्रत्येक नेमणूक किंवा केलेला नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना किंवा दिलेली नोटीस ही ह्या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसेल तेथवर आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नेमणुकीद्वारे किंवा नियमाद्वारे, काढलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा अधिसूचनेद्वारे किंवा दिलेल्या नोटिशीद्वारे रद्द करण्यात आली नसेल तर आणि रद्द करण्यात येईपर्यंत ती ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये काढण्यात किंवा करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल ;

(ब) अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमाच्या उपबंधांन्वये ठरविलेला कोणताही स्थायी आदेश, नमूद केलेली किंवा नोंदणी केलेली कबुलायत किंवा तडजोड, अंमलात आणलेले फेरबदल, केलेली निवेदने, किंवा राज्य औद्योगिक न्यायालय, जिल्हा औद्योगिक न्यायालय, कामगार आयुक्त, निबंधक किंवा वेतन मंडळाने केलेले निवाडे किंवा काढलेले आदेश या

गोष्टी ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधानुसार समुचित अधिकाऱ्याने ठरविलेल्या, नमूद केलेल्या किंवा नोंदणी केलेल्या, अंमलात आणलेल्या किंवा दिलेल्या असल्याचे समजण्यात येईल ;

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार, प्राप्त झालेली किंवा संपादन केलेली किंवा पत्करलेली कोणतीही जबाबदारी किंवा दायित्व यांवर परिणाम होणार नाही आणि असा हक्क, विशेषाधिकार, जबाबदारी किंवा दायित्व यांच्या बाबतीतील कोणतीही चौकशी, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना ती या अधिनियमाच्या उपबंधांशी जेथवर विसंगत नसेल तेथवर ती, जणू काही हा अधिनियम रद्द करण्यात आला नव्हता व तो चालू होता असे समजून ती दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा तिच्यापासून लाभ घेता येईल ;

(ड) राज्य औद्योगिक न्यायालय, जिल्हा औद्योगिक न्यायालय, कामगार आयुक्त, निबंधक किंवा वेतन मंडळ याजपुढे अनिर्णित असलेले अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमाच्या उपबंधांखालील कोणतेही कामकाज, समेटाप्रित्यर्थ चालविलेले कामकाज किंवा या अधिनियमाच्या उपबंधान्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या न्याय चौकशीसंबंधी असलेले कोणतेही कामकाज, हे हा अधिनियम रद्द करण्यात आला नव्हता व तो अंमलात होता असे समजून चालू ठेवण्यात येईल व ते पूर्ण करण्यात येईल ; आणि अशा कार्यवाहीत लादलेल्या कोणत्याही शास्तीची अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये नोंदणी करण्यात येईल ;

(इ) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये एखाद्या उद्योगधंद्यासाठी कोणत्याही स्थानिक क्षेत्रात मान्यताप्राप्त संघ म्हणून नोंदणी केलेला कोणताही संघ हा ह्या अधिनियमान्वये त्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगधंद्याचा प्रातिनिधिक संघ म्हणून समजण्यात येईल ;

(फ) अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमान्वये कामगारांचे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्यास व काम करण्यास हक्क असलेले, निवडून आलेले इतर कोणतेही प्रतिनिधी हे, उक्त अधिनियम रद्द करण्यात आला असला तरीही अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमाखालील कोणत्याही कामकाजात, कामकाज पूर्ण होईपर्यंत ते कामगारांचे प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे चालू ठेवतील.".

(यथार्थ अनुवाद)
वा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.